ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार ५ आणि १९ जून, १९७४ | अंक ११ आणि १२



# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मनेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेही गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, व्हॉइल वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड व धुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'डेफिकाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

कल्याण • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. १
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ आणि १९ जून, १९७४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## हरितक्रांतीमुळे जननसंख्येत घट

पंजाबमध्ये गहू उत्पादन करण्याच्या बाबतीत हरितक्रांती झालेली आहे. म्हणजे आधुनिक उत्पादनतंत्र व खते ह्यांचा उपयोग करून गव्हाच्या निर्मितीत चांगली वाढ साध्य करता आलेली आहे. हरितक्रांती हा शब्द गेल्या काही वर्षांत रूढ झाला आहे तो उत्पादनात झालेल्या वाढीच्या संदर्भातच; तथापि ह्या बदलामुळे भारताच्या काही भागात सामाजिक क्षेत्रात अनपेक्षित परिणाम घडून आलेले दिसत आहेत. ज्या भागांत गव्हाची हरितक्रांती घडून आली आहे तेथील समाजात शेत-मजुरांची मागणी वाढलेली दिसून येत आहे. बाहेरील शेतमजूर लावावयाचे म्हणजे त्यांना वाजवी रोजगारीही द्यावी लागते. ह्याचा परिणाम उत्पादनाचा खर्च वाढण्यात होतो. तो टाळण्या-साठीच की काय शेतकरी आपल्या मुलींची लग्ने लांबणीवर टाकू लागले आहेत. ह्याचा परिणाम जननसंख्येवर होणे अपरिहार्यच आहे. ती घटण्यास विवाहाची वेळ लांबणीवर टाकण्याचा उपाय पुढे येऊ पाहात आहे. भारतात सध्या निदान ग्रामीण भागांत तरी मुलीच्या विवाहाचे वय १५ ते १६ च्या दरम्यान असते. मुलींना शेतकामास लावण्याची वृत्ती वाढीला लागल्यास ते वय २० पर्यंत पुढे जाईल आणि जननसंख्येत २५ टक्क्यांनी घट होईल असा अंदाज करण्यात आला आहे. लग्नाचे वय लांबणीवर टाकून जननसंख्या घटविण्याचा प्रयोग बऱ्याच विकसनशील देशांनी करून पाहिला असून तो यशस्वी झाला आहे. चीनने ह्या उपायाचा अवलंब केला. त्याचप्रमाणे स्वीडन देशातही लग्नाचे वय वाढविण्यात आले आहे. भारतात हा प्रयोग करून पाहण्यास हरकत नसावी.

---

## मोठ्या व्याजाची आशा लावून फसवाफसवी

भडकत्या महागाईला तोंड देण्यासाठी सर्वच जण प्रयत्न करीत असतात. घरात मिळवती माणसे असली तर गाडा कसाबसा चालतो. पण पतीने मागे ठेवलेल्या धनसंचयावर अगर मोठ्या कष्टाने चार पैसे शिल्लक टाकलेल्या लोकांचे हाल वाढतच जातात म्हणजे त्यांच्यापुढे प्रश्न असतो तो असा की आहे त्या पुंजी-पासून अधिकाधिक धनप्राप्ती कशी होईल ? ह्या परिस्थितीत सापडलेले लोक जादा व्याजाच्या दरांना सहज बळी पडतात. बंगलोर शहरात अशी एक आंतरप्रांतीय टोळी सापडली आहे की तिने जबर व्याजाची आशा दाखवून अनेकांना लुबाडले आहे. सेवानिवृत्त झालेले नोकर, पती गमावलेल्या बायाबापड्या आणि इतर धोपटमार्गी लोक ह्या टोळीच्या जाळ्यात सापडून फसले आहेत. एकट्या बंगलोर शहरातच अशा रीतीने ८ लाखांची फसवणूक झालेली आहे. टोळीची कार्यपद्धती अशी आहे. प्रतिष्ठित भासणारे गुंतवणूक सल्लागार मोठमोठ्या शहरातून आपल्या कचेऱ्या उघडतात. मुंबई, दिल्ली, नागपूर अशा शहरा-तील मोठ्या प्रसिद्ध कंपन्यांतून पैसे गुंतविण्याचा सल्ला ते लोकांना देतात. व्याजाचा दर चांगला आकर्षक म्हणजे १५ टक्के सांगण्यात येतो. कचेरी अर्थातच अद्ययावत असते. ह्या व्याजाच्या दराला भुलून अनेक लोक ठेवी ठेवतात. पण व्याज देण्याची अगर ठेव परत देण्याची वेळ आली की पहिल्या सल्लागाराची नेमकी बदली झालेली असते. ह्या टोळीतील लोकांचे आपसातील बोलणे चुकून ऐकले गेल्याने सर्व प्रकार उघडकीस आला.

---

## अणुबाँब तयार करण्यासाठी पाकची धडपड

भारताने केलेला अणुस्फोट शांततामय कामासाठी आहे ह्या पंतप्रधान इंदिरा गांधींच्या आश्वासनाची दखल न घेता पाकिस्तान अणुबाँब तयार करण्यासाठी जोराचे प्रयत्न करू लागला आहे. पण त्यासाठी लागणारे द्रव्यबळ आणि तांत्रिक ज्ञान पाकिस्तानजवळ आज नाही, म्हणून ह्या दोन्ही क्षेत्रांत लागणारे साह्य चीन आणि फ्रान्सकडून मिळविण्याची खटपट पाकिस्तानचे सरकार करू लागले आहे. कराची येथे अणुशक्तीवर वीज निर्माण करण्याचे केंद्र उभारण्याच्या कामी कॅनडाने पाकिस्तानला मदत केलेली आहे. परंतु आंतरराष्ट्रीय अणुशक्ती मंडळाचे ह्या केंद्रावर नियंत्रण आहे. अर्थात तेथून अणुस्फोटासाठी लागणारे प्ल्युटोनियमचे इंधन उघडपणे अगर गुप्तपणे मिळविणे पाकिस्तानला शक्य होणार नाही. इस्लामाबाद येथे आणखी एक छोटे अणुशक्ती केंद्र उभारण्यात आले आहे. परंतु त्या केंद्रांतून अणुस्फोटासाठी लागणारे इंधन तयार होण्यासारखे नाही. कॅनडा पाकिस्तानला आता ह्या बाबतीत मदत करण्यास तयार नाही; निदान नाराज आहे. फ्रान्स पाकिस्तानला जरूर ती मदत करील किंवा नाही ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. अलीकडे पाकिस्तानच्या शास्त्रज्ञांची एक तुकडी अणुसाह्य मिळविण्यासाठी फ्रान्सला गेली होती. पाकिस्तानचे पंतप्रधान काही दिवसांपूर्वी चीनला भेट देऊन आले. त्या भेटी त्यांनी अणुशक्तीच्या विकासासाठी चीन-कडून साह्य मिळविण्याचा प्रयत्न केला होता. साह्य देण्यासाठी पाकिस्तानवर चीनने काही अटी घातल्या होत्या. त्यात अणु-केंद्रावर चिनी तज्ज्ञांची नेमणूक व्हावी अशी एक अट होती. ही व इतर अटी मान्य होण्याचा संभव कमी आहे.

### मुंबईच्या हलवायाची लंडनमध्ये चलती

लंडनमधील हिंदी हलवायाचे दुकान खूपच यशस्वी झाले असून इंग्लंडमधून भारतात येणारे लोक बरोबर मिठाई आणू लागले आहेत! मुंबईच्या रॉयल स्वीट्सने हा उपक्रम केला आहे. लंडनमधील फर्मला बॉम्बे हलवा लि. असे नाव देण्यात आले असून त्यातील इंग्रज भागीदार टी. आर. सुरतवाला आणि सन्स पूर्वी भारतामधून मिठाई मागविण्याचा धंदा करीत असे. भागीदारीच्या अटीप्रमाणे रॉयल स्वीट्सला नफ्याचा वाटा आणि डिव्हिडंड्स् भारताकडे पाठविण्याचा अधिकार आहे. धंदा लंडनमध्ये इतका लोकप्रिय झाला आहे की, तीनच महिन्यांत ब्रॅडफर्ड येथे आणखी एक दुकान उघडण्यात आले आणि आणखी दोन दुकाने लंडनमध्येच (एक वेस्टएंड येथे आणि दुसरे वेंब्ले येथे) सुरू करण्यात येईल. इंग्लंडमध्ये स्थाइक झालेल्या आशियाई लोकांची संख्या मोठी आहे. तेच लोक ह्या मिठाईची गिऱ्हाइके आहेत. "भारतात दर किलोला २० ते २४ रु. देऊनही चांगले तूप मिळत नाही इंग्लंडमध्ये अत्युत्कृष्ट ऑस्ट्रेलियन तूप किलोला १२ रु. ह्या दराने मिळते. साखरेला भारतात ४ रु. पडतात, इंग्लंडमध्ये ती रु: २-२० ला मिळते. भारतात कच्च्या मालाच्या निकृष्ट दर्जामुळे ३ ते ५% एवढी उत्पादनात घट येते. तेथे घट मुळीच येत नाही. ब्रिटिश सरकारने सहा जणांना तेथील फॅक्टरीत काम करण्यास येण्यासाठी परवाने दिलेले आहेत, आता आणखी सहा जणांना मिळतील. ह्यापुढे भारतातून कॅनडाकडे आणि अमेरिकेकडे मिठाई निर्यात करण्यापेक्षा लंडन येथून ती पाठविणे किफायतशीर होईल" असे बॉम्बे हलवा लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नून हे म्हणाले.

---

### पुकारा हरितक्रांतीचा, आयात अब्जावधी रु. ची

१९६५ ते १९७३ ह्या नऊ वर्षात भारताने एकूण २६,३५,००,००,००० रुपये किंमतीच्या धान्याची आयात केली. सर्वात जास्त रक्कम (५३२ कोटी रु.) १९६७ मध्ये खर्ची पडली, तर सर्वात कमी (२४ कोटी रु.) १९७२ मध्ये खर्ची पडली. वार्षिक सरासरी २९३ कोटी रु. एवढी झाली. गव्हाच्या उत्पादनाच्या उच्चांकांच्या काळातही (१९६८ ते १९७१) धान्याच्या आयातीवर भारताने दरसाल २३६ कोटी रु. खर्च केले. १९७३ मधील धान्याची आयात ३२० कोटी रु. ची झाली. रशियाकडून आणलेल्या २० लक्ष टन गव्हाच्या किंमतीचा वरील आकड्यात समावेश नाही. कारण, त्याची किंमत रोखीने द्यावयाची नसून तेवढाच गहू रशियाकडे निर्मत करून देणे फेडावयाचे आहे.

---


म. ए. सोसायटीचे

## गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स

पुणे ४

* उन्हाळयाच्या सुटीनंतर दि. १५ जून १९७४ पासून शैक्षणिक वर्षाची सुरुवात.
* बी. कॉम. पदवीसाठी, अॅडव्हान्स्ड अकौंटिंग अॅण्ड ऑडिटिंग, अॅडव्हान्स्ड कॉस्ट-अकौंटिंग व इंडस्ट्रियल मॅनेजमेंट या विषयांची सोय.
* एम. कॉम. भाग १ आणि भाग २ अभ्यासक्रम शिकविण्याची सोय. दुसऱ्या भागाच्या अभ्यासक्रमासाठी अॅडव्हान्स्ड अकौंटिंग, अॅडव्हान्स्ड कॉस्टिंग, बिझिनेस अॅडमिनिस्ट्रेशन व कंपनी लॉ अण्ड टॅक्सेशन् या विषयांची सोय.
* एम. कॉम. व बी. कॉम. चे वर्ग सकाळी ७॥ ते ११॥. पदवीपूर्व व एफ्. वाय्. कॉम् चे वर्ग दुपारी ११॥ ते ४॥.
* माहितीपत्रक व 'प्रवेश अर्ज' कचेरीत एक रुपयास मिळेल. टपालाने पाहिजे असल्यास रु. १·५० ची तिकिटे पाठवावीत. कार्यालयाची वेळ सकाळी ९ ते दुपारी २.
* १९७३-७४ मध्ये याच महाविद्यालयात शिकत असलेल्या व मार्च १९७४ मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या विविध परीक्षांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी निकाल लागल्यावर ताबडतोब प्रवेश घ्यावा. उशिरा आल्यास प्रवेशाची हमी नाही.

दा. वा. खिरसुले,
प्राचार्य

दि. ३१ मे १९७४

# सहकारी ग्राहक संस्थांना दारू विकण्यास सरकारी प्रोत्साहन ?

### समर्थ वाइन शॉपची हकीकत

( द. म. सुतार )

चौदा एप्रिल १९७४ रोजी ठाणे येथे समर्थ सहकारी ग्राहक भांडार ( मर्यादित ) या संस्थेच्या खास सर्वसाधारण सभेत अशा सहकारी भांडारांनी मद्यविक्री करावी की न करावी या प्रश्नावर चर्चा झाली. ही चर्चा अनेक दृष्टींनी उद्बोधक ठरली. व्यक्तीच्या तसेच एकूण समाजाच्या हितास सर्वथैव घातक असलेल्या मद्याच्या व्यसनाबाबत सर्वसाधारण सुशिक्षित समाज किती बेफिकीर, उदासीन आणि तटस्थ वृत्तीचा आहे हे या सभेतील भागधारकांच्या उपस्थितीवरून दिसून आले. एकूण पाच हजार सदस्य असलेल्या या संस्थेच्या खास मागणीवरून भरलेल्या सभेस सुमारे साडेतीनशे सदस्य हजर होते आणि पाच तासांच्या वादळी चर्चेनंतर झालेल्या मतदानात भाग घेण्यास २३४ सभासद हजर होते. संस्थेने आधीच सुरू केलेले 'समर्थ वाइन शॉप' नावाचे मद्यविक्रीचे दुकान चालू ठेवण्यास १२२ मते अनुकूल पडली व ते बंद करावे असे म्हणणारे ११२ असल्याने अखेर दुकान चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मद्यपानाबाबतची सुशिक्षित समाजाची तटस्थता, उदासीनता अशा रीतीने व्यक्त झाली.

दारूबंदी हे शासनाचे उद्दिष्ट कायम असताना बेकायदा मद्यविक्रीस आळा घालण्यास असमर्थ ठरल्याने सरकारने दारूबंदीचे धोरण शिथिल करण्याचा निर्णय घेतला नि परिणामी मद्यविक्रीच्या दुकानांची संख्या प्रतिदिनी सर्व राज्यांत वाढत असल्याचा अनुभव येत आहे. ठाण्याच्या या 'समर्थ वाइन शॉप' मुळे आजवर केवळ वैयक्तिक मालकीच्या असलेल्या दारूदुकानांच्यासख्येत आता सहकारी ग्राहक भांडारांकडून उघडल्या जाणाऱ्या दुकानांची भर पडण्याची घातक शक्यता निर्माण झाली आहे. ही सहकारी ग्राहक भांडारे दुसऱ्या जागतिक युद्धानंतर अन्नधान्याची टंचाई निर्माण झाल्यावर एक सामाजिक गरज म्हणून जागोजाग स्थापन झाली. खासगी व्यापाऱ्यांनी जीवनावश्यक वस्तूंची कोंडी करून अमाप नफा मिळविण्यास सुरुवात केल्यावर त्यावर उतारा म्हणून ग्राहकांच्या सहकारी संस्था सरकारच्या पाठिंब्याने निघू लागल्या आणि त्यांनाच अग्रहक्काने शिधावाटपाची ( रेशनिंगची ) दुकाने सरकारने चालविण्यास देण्यास सुरुवात केली. अन्नपदार्थांत भेसळ न करता रास्त भावात ते जनतेला पुरविणे हा या संस्थांचा हेतू होता व आहे. आता ग्राहक सहकारी संस्था जीवनावश्यक वस्तूंत मद्याचा अंतर्भाव करू शकतात का, त्यांच्या मूलभूत स्थापनेच्या उद्दिष्टात मद्याची विक्री येते का, व ती तशी येत नसल्यास सरकारने अशा ग्राहक सहकारी संस्थांस मद्यविक्रीची परवानगी देणे योग्य ठरेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. दारूबंदी तत्त्वतः मान्य असणाऱ्या सरकारला दारू ही जीवनावश्यक वस्तू आहे असे ठरविता येईल का ? ठाण्याच्या 'समर्थ वाइन शॉप'ने दारूस जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत दाखल करून सरकारला तत्त्वतः मान्य असलेल्या दारूबंदीला सुरुंग लावला आहे.

मद्यविक्रीचे पुरस्कर्ते अर्थप्राप्तीचा एक ठराविक मुद्दा मोठ्या हिरिरीने मांडतात. 'समर्थ वाइन शॉप'च्या पुरस्कर्त्यांचा पुष्कळसा नव्हे तर सगळा भर याच मुद्द्यावर होता. संबंधित ग्राहक सहकारी संस्थेला झालेले जबर नुकसान भरून काढण्यासाठी मद्यविक्री विभाग सुरू करण्याचा मार्ग संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अवलंबिला आणि तोही आपद्धर्म म्हणून ! आपल्या संस्थेत मद्यविक्री सुरू करून विनासायास द्रव्यप्राप्ती करणे हे त्यांच्या कर्तृत्वास कमीपणा आणणारे आहे. अर्थप्राप्तीचे कारण सांगून दारूदुकाने सहकारी ग्राहक संस्थांनी खोलणे याचा अर्थ सचोटी, सहकार, कार्यक्षमता, निःस्वार्थ लोकसेवेची संघटित प्रवृत्ती यांवरील सहकारी कार्यक्षेत्रात काम करणाऱ्यांचा विश्वास उडाला आहे असाच आहे. दारूदुकानांमुळे होणारी अर्थप्राप्ती ही तत्त्वतः आणि व्यवहारतः व्यक्तीला आणि समाजाला अनर्थाप्रत नेणारी आहे. नफ्याच्या रूपाने जितकी प्राप्ती दुकानदाराला, कराच्या रूपाने सरकारला होते त्याच्या कितीतरी पटीने जास्त ती मद्यपान करणाऱ्याच्या संसाराला आर्थिक आपत्तीत तर ढकलतेच


बँकेतील नोकरीसाठी बँकिंग व बुककीपिंग या विषयांचा आवश्यक व उपयुक्त अभ्यासक्रम

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

४२ वी बॅच गुरुवार दि. २७ जूनपासून सुरू होईल.

मुदत :- २ महिने. वेळ :- सकाळी. माध्यम :- इंग्रजी व मराठी

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

७१४ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे ४११००२.

नि वर त्या मद्यप्याला माणुसकीला वंचित करून त्याच्या भावी पिढ्यांच्या आरोग्यालाही अनर्थावह ठरते. दारूचा पैसा हा पापाचा, अनर्थाचा मानतात तो यासाठीच. अर्थप्राप्तीसाठी मद्यविक्रीचा पुरस्कार करणारे हे 'अल्पस्य हेतोर्बहुहानमिच्छन्' या कोटीतील मूढ मानव आहेत.

'समर्थ वाइन शॉप' संबंधाने झालेल्या चर्चेत बेकायदा काळाबाजार करून मिळविण्यात येणाऱ्या नफ्यापेक्षा कायदेशीर असलेली मद्यविक्री करून मिळविण्यात येणारा नफा श्रेष्ठ व योग्य असल्याचे सांगण्यात आले. मद्यविक्रीस आता कायद्याने परवानगी दिली असल्याने मद्यांत असलेले सर्व दोष जणू नाहीसे झाले अशा आविर्भावात मद्यविक्रीस सरकारमान्यता लाभल्याचे समर्थन करण्यात आले. दारूबंदीचे तत्त्व तत्त्वतः मान्य करून व्यवहारात दारूबंदी शिथिल करून जी शृंगापत्ती सरकारने ओढवून घेतली आहे तिचा फायदा मद्यपानाचे पुरस्कर्ते आज घेत आहेत. शेवटी मानवनिर्मित कायद्यापेक्षा श्रेष्ठ असा शाश्वत स्वरूपाचा नैतिक कायदा आहे. या कायद्याचे उद्दिष्ट माणसाचा चांगला माणूस करणे हे आहे. चांगुलपणा हा सर्व मानवनिर्मित कायद्यांचा आधारभूत पाया आहे हे लक्षात घेतले म्हणजे दारूविक्री ही मानव कल्याणाच्या सर्वश्रेष्ठ कायद्यानुसार केव्हाही निषिद्धच आहे. मानवनिर्मित कायदे बदलतात, पण चांगुलपणाच्या, माणसाच्या शाश्वत कल्याणाच्या कसोट्या बदलत नाहीत आणि ती शाश्वत कल्याणाची बाबच दारूविक्रीचा, मद्यपानाचा विचार करताना निर्णायक मानली पाहिजे.

कोणत्याही कार्यामागे काही प्रेरणा असते. कोणीतरी श्रेष्ठ मार्गदर्शन करतो व त्या मार्गाचे अनुकरण केले जाते. अडचणीच्या वेळी अशा मार्गदर्शनाची जास्तच निकड असते. ठाण्याच्या या ग्राहक संस्थेला गतसाली फार मोठा तोटा आला. या संस्थेचे कार्यकर्ते सहकारी संस्थांच्या श्रेष्ठ अधिकाऱ्याला भेटून त्याच्याबरोबर या प्रश्नाची चर्चा करीत असता त्या अधिकाऱ्यानी संस्थेला सध्या होत असणारा तोटा असाच होत राहिला तर सरकारला या संस्थेस मदत देणे कठीण होईल असे सांगितले. हा आर्थिक तोटा भरून काढण्याचा उपाय म्हणून संस्थेने दारूचे दुकान का उघडू नये, असा सल्लाही या अधिकाऱ्याने दिला. ग्राहक सहकारी संस्थांना मद्याची विक्री करता येईल का या सहकारी कार्यकर्त्यांच्या शंकेलाही याच अधिकाऱ्यांनी सरकारने सहकारी साखरकारखान्यांना मद्यनिर्मितेचे परवाने दिले असल्याने आता सहकारी ग्राहक भांडारांना मद्यविक्री करण्यास सरकारी कायदा आड येणार नाही असेही मत व्यक्त केले नि हजारो रुपयांचा संस्थेस झालेला तोटा भरून काढण्याचा अनपेक्षित मार्ग सापडला अशा दृष्टीने या कार्यकर्त्यांनी संस्थेतर्फे दारूदुकान सुरू करण्याचा झटपट उद्योग केला. कार्याची नवीन उपक्रमांची प्रेरणा ही स्वार्थनिरपेक्ष जनहितदक्ष अशा कार्यकर्त्यांकडून घ्यावयाची का ती शासनाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याकडून नि तीहि केवळ अर्थलाभावर नजर ठेवून जनहितास मारक असा सल्ला देणाऱ्या अधिकाऱ्याकडून घ्यावयाची का, असाही प्रश्न या संबंधात निर्माण झाला आहे. भाषा बदलली, समाजहित व्यक्त करणाऱ्या परिभाषेत बदल झाला तरी व्यक्तिहित, किंवा काही माणसांच्या समुदायाचे हित हे एकूण समाजाच्या हिताला विरोधी असता कामा नये हे समाजकल्याणाचे सूत्र अनादिकालापासून आहे तेच आहे. काही श्रेष्ठ मानवी मूल्यांचे जतन करणे, माणुसकीला जपणे हा साऱ्या मानवी व्यवहाराचा गाभा आहे. अर्थप्राप्ती हे साध्य नसून माणुसकी टिकविण्याचे ते एक साधन आहे. हा साध्य आणि साधन यांतील फरक न ओळखणारेच मद्यविक्रीचा अनैतिक व्यवहार करू शकतात. समाजहितैषी अनेक सज्जन एकत्र येऊन स्थापन झालेल्या सहकारी ग्राहक संस्थांना याच कारणासाठी मद्यविक्री करता येणार नाही. सुलभ अर्थप्राप्तीच्या व्यवहाराच्या नियमांपेक्षा श्रेष्ठ असे जे मनुष्य व्यवहाराचे नियमन करणारे कायदे आहेत त्या कायद्यानुसार व्यक्तिकडून होणाऱ्या मद्यविक्रीपेक्षा सहकारी ग्राहक संस्थांकडून होणारी मद्यविक्री ही अधिकच निषेधार्ह आहे.

'कल्याण यात्रा' – मे, १९७४

---

**जागतिक बँकेला अरबी देशांचे कर्ज**—वॉशिंग्टन येथे मुख्य कचेरी असलेली जागतिक बँक काही छोट्या अरबी देशांच्या समूहाकडून ७·५ कोटी डॉलर्सचे कर्ज घेणार आहे. विकसनशील देशांना कर्जे देण्याकडे त्याचा विनियोग केला जाईल.

---


# NESS WADIA
## College of Commerce, Poona-1.

**The College will reopen after the Summer Vacation on 15th June 1974.**

It admits students to all classes. i. e., from Pre-Degree (Commerce) to B. Com. Degree & M. Com. Parts I & II.

*Medium of Instruction* : **ENGLISH & MARATHI**

Special facilities, scholarships and stipends, are provided for first class students, sportsmen and poor students.

Facilities include a Special Coaching Scheme, Study Aids and Book Bank; etc. Advanced Accountancy, Advanced Banking and Advanced Statistics as optional subjects at T. Y. B. Com. class.

**For Prospectus and Admission Form apply with Rs. 2/-**

V. K. NULKAR
*Principal.*

## रशिआचे प्रचंड जलविद्युत धरण

सोव्हिएट रशिआत जगातील सर्वांत मोठे जलविद्युतकेंद्र बांधण्यात येत आहे. सायबेरिआतील येनेसी नदीवर बांधण्यात येत असलेल्या ह्या धरणाची विद्युतउत्पादनक्षमता ६,४०० मेगॅवॅट इतकी मोठी असेल. बीजनिर्मितीची ही योजना इतकी अवाढव्य आहे की अशा प्रकारच्या आणखी दोन योजना पुऱ्या करण्यात आल्यास आज भारतात जितकी वीज निर्माण होत आहे तितकी ह्या तीन योजनाच निर्माण करू शकतील. येनेसी नदीवर क्रास्नोयार्स्क येथे एक विद्युतनिर्मितीकेंद्र असून ते ६,००० मेगॅवॅट वीज निर्माण करत आहे. धरणावरील वीज निर्मितीचा सध्या तरी हा उच्चांक आहे. असे सांगतात. ह्या धरणाचे केवळ एकच जनित्र दिल्ली व कलकत्ता शहरांची गरज भागविण्याइतकी वीज निर्माण करते. तेथे विद्युतनिर्मितीची १२ जनित्रे आहेत. रशिआतील पूर्व भागात अनेक विद्युत्-निर्मिती-केंद्रे बांधण्यात येत आहेत. सायबेरियातील नव्याने सापडलेल्या खनिज संपत्तीचा फायदा उठविणे हा त्यांचा हेतू आहे. एके काळी सायबेरिआ हा एक निर्जन व ओसाड प्रदेश म्हणून गणला जात होता. पण, आता तो रशिआच्या खनिज संपत्तीचे भांडार म्हणून प्रसिद्धीस आला आहे. सायबेरिआत नैसर्गिक वायू, तेल, कोळसा, सोने, हिरे, टिन इत्यादी वस्तूंचे खूप मोठे साठे आहेत परंतु त्यांचा उपयोग करून घेण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर विजेची आवश्यकता आहे. म्हणून त्या प्रदेशांतील मोठ्या नद्यांवर वीजनिर्मितीची अनेक प्रचंड केंद्रे बांधण्याचे काम रशिआने हाती घेतले आहे.

---

## जडजवाहिरांची व रत्नांची निर्यात

१९७३–७४ सालाच्या पहिल्या ११ महिन्यांत भारताने ९२·५ कोटी रुपये किमतीची जडजवाहीर व रत्ने निर्यात केली. त्या मागील सालच्या ह्याच अवधीत ६३·८ कोटी रुपयांचे जड-जवाहीर निर्यात करण्यात आले होते. म्हणजे ह्या निर्यातीत ४५ टक्क्याने वाढ झालेली आहे. १९७३–७४ साली १०० कोटी रुपयांच्या मालाच्या निर्यातीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. संबंधित वर्षात करण्यात आलेल्या निर्यातीपैकी ७६·४ कोटी रुपयांचे हिरे होते. त्या मागील वर्षाच्या ह्याच अवधीत ५२·३ कोटी रुपयांचे हिरे निर्यात करण्यात आले होते.

---

## हिंदी टेलिफोनच्या सामग्रीला मागणी

भारतात तयार होणारे टेलिफोन आणि इतर संबंधित माल ह्यांचा दर्जा उच्च प्रतीचा असतो. त्यामुळे जगातील निरनिराळ्या भागांतील ४५ देशांकडून टेलिफोनच्या सामग्रीची मागणी येत आहे. बंगलोर येथील इंडिअन टेलिफोन इंडस्ट्रीज ह्या कंपनीकडे १९७३–७४ साली १६·५ लाख रुपयांच्या साहित्याच्या मागण्या नोंदविण्यात आलेल्या आहेत.

## पंजाब नॅशनल बँक इंग्लंडमध्ये तीन शाखा उघडणार

इंग्लंडमध्ये स्थायिक झालेल्या पंजाबी लोकांची संख्या मोठी आहे आणि ते दरसाल भारतात आपल्या बचतीचे पैसे पाठवतात. अवघ्या २०,००० लोकवस्तीच्या जालंदर (पंजाब) गावातील पंजाब नॅशनल बँकेच्या शाखेतील ठेवीत अशा रीतीने दरसाल सुमारे आठ कोटी रुपयांची भर पडते. विदेशी बँकांमार्फत ती पाठविली जाते. हे लक्षात घेऊन पंजाब नॅशनल बँकेला इंग्लंड-मध्ये शाखा उघडण्यास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली आहे. १४ बँकांचे जुलै १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर कुठल्याच बँकेला अशी परवानगी देण्यात आलेली नव्हती. लंडन (साउथ हॉल), कॉव्हेन्ट्री आणि बर्मिंगहॅम येथे ह्या शाखा सुरू केल्या जातील.

---

## नर्तिका व गायिका ह्यांची परिषद

हिंदमधील नर्तिका व गायिका ह्यांची एक परिषद लखनौ येथे येत्या सप्टेंबर महिन्यात भरविण्यात येणार आहे. ह्या बाबतीत पुढाकार घेणाऱ्या लखनौमधील एका प्रसिद्ध नर्तिकेच्या मताने भारतात ह्या धंद्यावर उपजीविका करणारी १० लाख कुटुंबे असावीत. हा धंदा करणाऱ्यांना पोलिसांकडून फार त्रास देण्यात येतो अशी तिची तक्रार आहे.

---


# दि बँक ऑफ कराड लिमिटेड, कराड

(शेड्युल्ड बँक)

रजि. ऑफिस : १५, रविवार पेठ, कराड, (जिल्हा सातारा)

(१) अधिक व्याज मिळवा

(२) १ एप्रिल १९७४ पासून वाढविलेल्या व्याजाच्या दराचा फायदा घ्या.

ता. १–४–७४ पासून अमलात आणलेले व्याजाचे दर :

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज ठेव | | ५·२५ टक्के. |
| मुदत ठेव | १ वर्ष ते २ वर्षांपर्यंत | ७·२५ टक्के. |
| मुदत ठेव | २ वर्षे ते ३ वर्षांपर्यंत | ८·०० टक्के. |
| मुदत ठेव | ३ वर्षे ते ५ वर्षांपर्यंत | ८·२५ टक्के. |
| मुदत ठेव | ५ वर्षांपेक्षा जास्त | ८·५० टक्के. |

शिक्षण संस्था, धर्मादाय संस्था, ट्रस्टना वरील दराशिवाय अर्धा टक्का जादा व्याजाचा दर दिला जाईल.

अधिक माहितीसाठी जवळचे शाखाधिकारी यांना भेटावे.

शाखा

कराड, मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटा, कोल्हापूर, मलकापूर, मोर, ताकारी, संगमेश्वर, कसबा तारळे, माहिम (मुंबई), चाफळ.

म. म. आठवले,
चेअरमन.

## रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांना आहेर

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार यांनी बंगलोर येथे बोलताना रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांवर टीका केली आहे. ते म्हणाले की रिझर्व्ह बँकेचे काम आता आधुनिक पद्धतीच्या हवामान सुखद राखणाऱ्या इमारतीत करण्यात येते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात बँकेची इमारत म्हणजे उकाड्याने घामाघूम करणारी एक भट्टीच होती असे म्हटले तरी चालेल. इतकी सुधारणा होऊनही तेथील अधिकाऱ्यांनी आपल्या कामाच्या पद्धतीत व नियमात बदल केलेला नाही. पूर्वी खराब झालेल्या नोटा चांगल्या नोटांमधून वेगळ्या निवडण्याचे काम करणाऱ्या अधिकाऱ्याला १०० ते १०५ अंश तपमानात काम करावे लागत असे. ब्रिटिश अमदानीत चलनी नोटांवर नियंत्रण ठेवणारा अधिकारी असे. तो प्रत्येक अधिकाऱ्याने किती नोटांचे निरीक्षण, परीक्षण करावे ह्याची संख्या ठरवीत असे. त्याला फार ताण पडू नये अशी दक्षता घेण्यात येई. आता अधिकारी आपले काम तास-दोन तासाच्या अवधीतच पार पाडतात ! कारण, खराब नोटांच्या परीक्षणाचेच काम पूर्वीच्याच पातळीवर राहिले आहे. ज्या वेळी ह्या अधिकाऱ्यांचे काम वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला त्यावेळी अधिकाऱ्यांच्या संघटनेने जादा कामाबद्दल जादा वेतनाची मागणी केली. माझ्याच कारकीर्दीत घडलेली ही घटना आहे. ह्या बाबतीत जपानचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे, जपानच्या रिझर्व्ह बँकेसारख्या बँकेत दर दिवशी खराब नोटा निवडण्याचे काम भारताच्या मानाने चौपट अधिक आहे. दोन्ही देशांतील अधिकाऱ्यांचे पगार मात्र सारख्याच पातळीवर आहेत.

---

## देना बँकेचे कोठारी ( मद्रास ) लि. मध्ये विलिनीकरण

देना बँकेच्या संचालकांनी बँकेचे कोठारी ( मद्रास ) लि. मध्ये विलिनीकरण सुचविले आहे. बँकेच्या ५० रु. च्या प्रत्येक २० भागांना कोठारीचे प्रत्येकी १० रु. चे ४६ भाग, प्रत्येकी १५ रु. चे ८·५ % व्याजाचे ४६ कन्व्हर्टिबल बाँड आणि प्रत्येकी १० रु. चे ८·५ % व्याजाची नॉन-कन्व्हर्टिबल १६३ डिबेंचर्स मिळतील. देना बँकेच्या २० भागांची बाजारातील किंमत १,९०० रु. आहे. त्यांच्या मोबदल्यात तिच्या भागधारकांना २,८०० रु. किमतीचे कोठारी ( मद्रास ) चे रोखे मिळतील. ज्या भागधारकांना रोख रक्कम हवी असेल त्यांना प्रत्येक ५० रु. च्या भागाच्या मोबदल्यात ११० रु. रोख मिळतील. ला. इं. कॉर्पोरेशन आणि इतर आर्थिक संस्था देना बँकेच्या ४८ % भांडवलाचे भागधारक आहेत. पूर्वीच्या बँकिंग कंपन्यांनी लिक्विडेशनचा अवलंब न करता एखाद्या औद्योगिक कंपनीत विलीन व्हावे, असे सरकारचे धोरण आहे.

---


**Deccan Education Society's**

**Brihan Maharashtra College of Commerce**
**Poona-4.**

**" Admissions For The Academic Year 1974-75. "**

The College will reopen on 15th June, 1974 for the academic year 1974-75. Enrollment will begin from 7th June 1974. In view of the limited accommodation, admissions to the B. Com. Part. I, S. Y. B. Com. and T. Y. B. Com. classes will be given in the first instance to the students of this college. Students from other colleges will be admitted, only if any vacancies are available. The students of this college should take admissions immediately after their respective examination results are declared.

Hours for Admissions :— 11·00 a. m. to 2·00 p. m.

1. The programme of admission to the various classes will be as follows :—

| | |
|---|---|
| P. D. Commerce | .. From 7th June to 10th June. |
| B. Com. Part I | .. Immediately after the declaration of the P. D. result. |
| S. Y. B. Com. | .. From 17th to 19th June. |
| T. Y. B. Com. | .. From 20th to 22nd June. |
| M.Com. (Part I&II) | .. From 1st July to 4th July. |

Students of this college must bring their Identity Cards and their statement of marks with them at the time of taking the admission.

2. Students seeking admission to the Pre-Degree Commerce class should bring with them the following documents along with the admission form :—

( 1 ) S. S. C. Statement of Marks ( Two copies of the same )

( 2 ) School leaving certificate ( ...do... )

( 3 ) Identity card-size photograph ( Two copies )

Forms of application for admission and copies of the Prospectus will be available in the College Office during Office hours. (i. e. from 11 a. m. to 4 p. m. )

3. Students should note the following College timings for the new academic year ( 1974-1975 ) :—

| | |
|---|---|
| P. D. Commerce<br>T. Y. B. Com. &<br>M. Com. Part-I | 8-00 a.m. to 11-25 a.m. |
| B. Com. Part I<br>S. Y. B. Com. | 11-45 a. m. to 3-10 p. m. |
| M. Com. | .. 6-30 p. m. to 8-30 p. m. |

**Dr. C. G. Vaidya**
**Principal.**

### काही मिनिटांतच धरणाची उभारणी करणार

शेतीसाठी व वीज उत्पादन करण्यासाठी डोंगराळ भागांत योग्य ठिकाणी धरणे बांधावी लागतात. मोठमोठ्या धरणांची बांधकामे पुरी होण्यास कित्येक वर्षे लागतात. हे काम काही मिनिटांत पुरे करण्याचे स्वप्न रशिअन तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ बाळगून आहेत. रशिआत वीजउत्पादनासाठी उपयोगी पडण्यासारख्या ज्या १० नद्या आहेत त्यांतील एका नदीवर नियंत्रित स्फोटांच्या साह्याने काही मिनिटांतच धरण उभारण्याची योजना आखण्यात आली आहे. नदीच्या काठावर असणाऱ्या खडकांत एकामागून एक अनेक स्फोट घडवून आणून खडक नदीच्या पात्रात पडतील अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. ह्या कामासाठी ५ लाख टन स्फोटकांचा वापर करण्यात येणार आहे. स्फोटांमुळे ५० कोटी घनमीटर खडक हवेत उडेल आणि त्यापैकी निम्मा-अधिक भाग नदीच्या पात्रात कोसळेल असे गणित करण्यात आले आहे. अर्थातच नदीचे पाणी ह्या नव्या भिंतीमुळे अडविले जाईल. नदीच्या पात्रात पडलेल्या खडकांचे तुकडे यांत्रिक साहाय्याने दाबून भिंतीतून वाहणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यात येईल. स्फोटांच्या साह्याने उभारण्यात यावयाच्या धरणाच्या भिंतीची उंची ३०० मीटरच्या आसपास असेल आणि लांबी तीन किलोमीटरपर्यंत असेल. स्फोटांसाठी वापरण्यात येणारे द्रव्य नेहमीचेच असेल. मात्र सर्व स्फोटांसाठी वापरण्यात येणाऱ्या द्रव्यांची स्फोटक शक्ती हिरोशिमावर १९४५ साली अमेरिकेने टाकलेल्या अणुबाँबपेक्षा २५ पटीने अधिक असेल. काही वर्षांपूर्वी रशिआतील पामीर पठाराच्या भागात डोंगराची दरड कोसळवून नदीचा प्रवाह बदलला होता, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

---

### १० लाख टन पोलादाची आयात करणार

मध्यवर्ती सरकारने चालू वर्षी १० लाख टन पोलादाची आयात करण्याचा निर्णय घेतला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर आयात करण्यासाठी २२० कोटी रुपयांचे परदेशीय चलन खर्च करावे लागेल असा अंदाज करण्यात आला आहे. देशातील पोलाद कारखान्यांच्या उत्पादनाची क्षमता लक्षात घेऊन आयात करण्याचे ठरविण्यात आले आहे. अशी तातडीची आयात केल्याशिवाय देशातील गरज भागविण्यात येणे अशक्य असल्याचे आढळून आले आहे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता ह्या वर्षी पोलादाच्या निर्मितीत घट होण्याचा संभव स्पष्ट होत आहे. गेल्या वर्षी ४४ लाख टन पोलादाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. परंतु तेही गाठण्यात येईल अशी लक्षणे दिसत नाहीत. पोलादाच्या निर्मितीत घट होण्याच्या कारणांची चौकशी करण्यात येत आहे.

---

शेती प्रदर्शनात भारत भाग घेणार—येत्या जुलै महिन्यात ब्रिटनमध्ये रॉयल ॲग्रिकल्चरल शो (प्रदर्शन) भरविण्यात येणार आहे. ह्या प्रदर्शनात भाग घेण्याचे भारताने ठरविले आहे. प्रदर्शनात अनेक जातीची शेतीला उपयुक्त असणारी जनावरे व शेतीची अवजारे दाखविण्यात येणार आहेत.

### रासायनिक युद्धाचा परिणाम

दक्षिण व्हिएटनाममधील युद्धात अमेरिकेच्या लष्कराला गनिमी काव्याने लढणाऱ्या शत्रूशी मुकाबला करावा लागला. गनिमी सैन्य घनदाट अरण्यांचा आश्रय घेऊन छुपे व आकस्मिक हल्ले करीत असे. अरण्ये ही त्यांची लपण्याची ठिकाणेच होती. त्यांची आश्रयस्थाने नष्ट करण्यासाठी अमेरिकन विमानांनी वनस्पती-सृष्टीचा नाश करणारी विषयुक्त रसायने विमानातून फवारली. ह्या रासायनिक युद्धाच्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकन कॉंग्रेसनेच एक मंडळ नेमले होते. मंडळावर आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ काम करीत होते. त्यांनी आपल्या अहवालात असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, दक्षिण व्हिएटनामच्या ज्या भागावर अशी रसायने फवारण्यात आली तेथील जमीन पिकास योग्य होण्यास १०० वर्षे लागतील.

---

### गोमांसाच्या निर्यातीला धार्मिक आणि आर्थिक विरोध

अरब देशांकडून तेलाची आयात करण्यासाठी भारत त्या देशांना होणारी निर्यात वाढविण्याच्या प्रयत्नात आहे. अरब देशांना सिमेंट, साखर, पोलाद, इत्यादी वस्तू निर्यात करण्यात येणार आहेत. पण त्याशिवाय गोमांस पाठविण्याचा विचारही सरकार करीत आहे. भारतात रोड जनावरांची संख्या खूपच आहे. त्यांची कत्तल करून गोमांस निर्यात करता येणे शक्य आहे. निर्यातीला धार्मिक कारणासाठी होणारा विरोध सोडला तरी आर्थिक कारणासाठीही विरोध होत आहे. भारतात सध्या खताची टंचाई जाणवत आहे. अशा वेळी जनावरांच्या मलमूत्राच्या रूपाने मिळणारे खत त्यांची मांसासाठी हत्या झाल्यास मिळणार नाही, असा युक्तिवाद करण्यात येत आहे. गुरांची मोठ्या प्रमाणावर हत्या झाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला धोका पोचेल असा विचार व्यक्त करण्यात येत आहे.

---


### कोकणात काचेचा कारखाना

कोकण विभागाचा विकास घडवून आणण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात त्या दृष्टीने एक पाऊल टाकण्यात आले आहे. जिल्ह्यातील कासरडे ह्या ठिकाणी काचेचा कारखाना काढण्यात येत आहे. त्याच्या पायाभरणीचा समारंभ श्री. एस. के. पाटील ह्यांच्या हस्ते झाला. हा एकूण प्रकल्प १·२ कोटी रुपयांचा आहे. तो खाजगी मालकीचा असून त्याची उभारणी होण्यास एक वर्षाचा अवधी लागणार आहे. १९७५च्या सुमारास त्यात उत्पादनास प्रारंभ होईल. कारखाना उभारणीच्या कामात कोल्हापूरच्या उद्योगपतींनी पुढाकार घेतला आहे. कारखान्याच्या इमारतीसाठी ७ लाख रुपये खर्च येणार आहे. कोकणातील लोकांना रोजगारी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व विशेष आहे.

---

**IMPORT SUBSTITUTE**

**GADRE KEYS**



ALL TYPES AS PER SPECIFICATION

**GADRE BROTHERS** MADHAVNAGAR (MAHARASHTRA)

PHONE NO 2318 GRAM: "SEWA"

Swastik FOAM

cosy sitting pleasure!




**SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.**
PUNE-411003

# दर्जेदार किर्लोस्कर एंजिनांना भारतीय मानक संस्थेचे प्रमाण पत्र

५ ते ८ हॉर्स पॉवर

IS 1601

ISI




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत. देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

**आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.**

किर्लोस्कर

**किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती**

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® ह्याकरिता किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

**बिगर-सरकारी कंपन्यांची नोंद ( १९६१-६२ ते १९७२-७३ ) ( आकडे कोटी रु. चे )**

| वर्ष | पब्लिक कंपन्या | | खासगी कंपन्या | | | एकूण अधिकृत |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अधिकृत भांडवल | संख्या | अधिकृत भांडवल | संख्या | भांडवल |
| १९६३–६४ | १४८ | ११३·२ | १०६० | ५७·६ | १२०८ | २७०·८ |
| १९६४–६५ | १७६ | १३९·५ | ११७४ | ६४·६ | १३५० | २०४·१ |
| १९६५–६६ | १२४ | १००·४ | ११८९ | ६१·१ | १३१३ | १६१·५ |
| १९६६–६७ | ७९ | ४८·३ | ९४२ | ५२·४ | १०२१ | १००·७ |
| १९६७–६८ | ७० | ५५·५ | ९६५ | ५१·९ | १०३५ | १०७·४ |
| १९६८–६९ | ६१ | १२९·९ | १०४१ | ५०·७ | ११०२ | १८०·६ |
| १९६९–७० | १०३ | १३०·१ | १३८४ | ८६·२ | १४८७ | २१६·३ |
| १९७०–७१ | ११२ | ९०·१ | १७८३ | ११७·४ | १८९५ | २०७·५ |
| १९७१–७२ | १८३ | १४८·३ | २३१० | १७९·६ | २४९३ | ३२७·९ |
| १९७२–७३ | २४१ | १२८·३ | २५७९ | १४५·१ | २८२० | २७३·४ |

**लिमिटेड कंपन्यांच्या संख्येतील वाढ मंदावली**

१९७२–७३ मध्ये २,८६० नव्या कंपन्या नोंदल्या गेल्या. १९७१–७२ मध्ये तत्सम संख्या २,५२४, १९७०–७१ मध्ये १,९२७ आणि १९६९–७० मध्ये १,५१० होती. १९६९–७० मध्ये नव्या कंपन्यांच्या नोंदीत ३५·४%, १९७०–७१ मध्ये २७·६%, १९७१–७२ मध्ये ३१·०% आणि १९७२–७३ मध्ये १३·३% वाढ झालेली दिसून येईल.

**नव्या सरकारी कंपन्यांची नोंद**

| वर्ष | संख्या | अधिकृत भांडवल कोटी रु. |
|---|---|---|
| १९६३–६४ | १९ | १६९·७ |
| १९६४–६५ | १५ | ७५·७ |
| १९६५–६६ | २८ | ११८·७ |
| १९६६–६७ | १८ | ६०·६ |
| १९६७–६८ | ९ | ७०·० |
| १९६८–६९ | १३ | ६९–३ |
| १९६९–७० | २३ | ५६·७ |
| १९७०–७१ | ३२ | १२५·६ |
| १९७१–७२ | ३१ | १९६·५ |
| १९७२–७३ | ४० | २२९९·८ |
| एकूण | २२८ | ३२३७·६ |

१९७२-७३ मधील नव्या ४० सरकारी कंपन्यांचे अधिकृत भांडवल २,२९९·८ कोटी रु. एवढे प्रचंड भरले, कारण त्यापैकी स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया ( SAIL ) चे अधिकृत भांडवलच २,००० कोटी रु. आहे.

खासगी क्षेत्रातील नव्या २,८२० कंपन्यांचे मिळून अधिकृत भांडवल २७३·४ कोटी रु. भरले.

---

**कापड-गिरण्या स्वत:ची वीज निर्मिणार**

महाराष्ट्रातील विजेच्या पुरवठ्यावर अवलंबून राहिल्यास कापड गिरण्यांना अडचणींना तोंड द्यावे लागते, म्हणून कापड गिरण्यांचे चालक स्वत:ला लागणारी वीज स्वत:च स्वतंत्रपणे निर्माण करण्याचा विचार करीत आहेत. वीज बोर्डातून होणारा पुरवठा त्यांना बेभरवशाचा वाटत आहे. लवकरच भरणाऱ्या गिरणी मालक संघटनेत ह्या विषयीच्या एका योजनेची चर्चा करण्यात येण्याचा संभव आहे. प्रारंभी ६० मेगॅवॅट वीज निर्माण करण्याची यंत्रणा उभारण्यात येण्याचा संभव आहे. कापड-गिरण्यांना १३० मेगॅवॅट विजेची गरज आहे. पण त्यांना पुरवठा मात्र ९० मेगॅवॅट इतकाच होतो. अलीकडेच वीजपुरवठ्यावर जे निर्बंध घालण्यात आले त्यांचा सर्वात अधिक तडाखा कापड गिरण्यांना बसत आहे. विजेच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे रोजच्या उत्पादनात घट झाली आहे.

---

**खताच्या व्यापाऱ्यांना झालेल्या शिक्षा**

रासायनिक खताबाबत सरकारने जे नियम जारी केले आहेत, त्यांचा भंग केल्याबद्दल उत्तर प्रदेशातील १७३० परवानाधारक व्यापाऱ्यांना शिक्षा करण्यात आलेल्या आहेत. राज्यात भ्रष्टाचार व भेसळविरोधी ६३१० छापे घालण्यात आले. परिणामी रासायनिक खताच्या वाटपासाठी देण्यात आलेली ३०,१४७ पोती साठा करून ठेवण्यात आलेली आढळली. ५७१ व्यापाऱ्यांची नोंदणी-पत्रके रद्द करण्यात आली आणि १८४ व्यापाऱ्यांना समज देण्यात आली. खताच्या वाटपाबद्दल गैरप्रकार केले म्हणून ७१ व्यापाऱ्यांवर झटपट खटले करण्यात आले व त्यांना शिक्षा करण्यात आल्या. २२५ व्यापाऱ्यांवर अजूनच खटले करण्यात आलेले आहेत.

---

## भारताचा पहिला अणुस्फोट

गेल्या महिन्याच्या मध्याला भारताने १०० मीटर खोलीवर आपला अणुस्फोटाचा पहिला प्रयोग केला. १९४५ साली दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या पर्वात जपानच्या हिरोशिमा शहरावर जो अणुबाँब टाकण्यात आला होता, त्याच्यापेक्षा भारताच्या अणुस्फोटकाचा आकार जरा लहान होता. हिरोशिमावर स्फोट करण्यात आलेला बाँब २० किलो टनचा होता. १९६४ साली चीनने एवढ्याच आकारमानाच्या बाँबचा प्रथम स्फोट घडवून आणला होता. भारताच्या अणुस्फोटकाचे आकारमान १० ते १५ किलो टनचे होते. अणुस्फोटकाची जी तांत्रिक माहिती सांगण्यात आली तीवरून असे दिसते की जपानवर टाकण्यात आलेल्या अणुस्फोटाच्या मानाने भारताने अधिक कुशल तंत्रज्ञानाचा उपयोग केला होता. भारतात अणुस्फोटासाठी लागणारे मूलद्रव्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे.

---

## चीनची बांगला देशाला अप्रत्यक्ष मान्यता

बांगला देशाने संयुक्त राष्ट्र संघटनेत प्रवेश मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना चीनने आपला नकाराधिकार वापरून आजवर खो घातला होता. तथापि, आता चीनचा पवित्रा बदललेला दिसतो. पाकिस्तानचे पंतप्रधान मि. भुत्तो गेल्या महिन्यात चीनला गेले होते. त्या वेळी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र 'पीपल्स डेली' ह्यात एक अग्रलेख लिहिण्यात आला होता. ह्या अग्रलेखात बांगला देशाचा उल्लेख त्याच नावाने करण्यात आला आहे. पूर्वी "तथाकथित" अशी उपाधी बांगला देशाच्या मागे लावण्यात येत असे. भारत, बांगला देश आणि पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान अलीकडे जो त्रिपक्षीय करार करण्यात आला त्याचे चीनने स्वागत केले आहे. आता चीन सुरक्षा-मंडळात आपला नकाराधिकार वापरील असे नाही.

---

## कापड-गिरणीचा विस्तार करणार

नागपूर येथील मॉडेल मिलचा विस्तार करण्याची योजना महाराष्ट्राच्या कापड महामंडळाने तयार केली आहे. ही गिरणी मंडळातर्फे चालविली जात आहे. गिरणीचा विस्तार करण्यासाठी आणि तीत अद्ययावत यंत्रसामग्री बसविण्यासाठी सुमारे १ कोटी रुपये खर्च येणार आहे. गिरणी अत्याधुनिक बनविण्याची योजना पुरी झाली म्हणजे उत्पादनाचा खर्च बराच कमी होऊन मालाचा दर्जाही सुधारेल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. १९५९ साली सरकारने ही आजारी गिरणी प्रथमच ताब्यात घेतली. तेव्हापासून कापडाचे उत्पादन ७५ हजार मीटरवरून ९६ हजार मीटरपर्यंत वाढले आहे. उलट, मजुरांची संख्या मात्र कमी झाली आहे. आता अलीकडेच गिरणीला नफा होऊ लागला आहे.

---


"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. १०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक



BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

## चित्रपटांचा दर्जा का खालावला ?

### गल्ला भरण्यासाठी सावकारांचा दुराग्रह

१९७३ मध्ये भारतात ४१० चित्रपट तयार करण्यात आले; जपानने ४०४ तर अमेरिकेने २०० चित्रपट तयार केले. म्हणजे, चित्रपट-निर्मितीत भारत सर्व देशांत अग्रेसर झाला आहे. १९७२-७३ मध्ये हिंदी चित्रपट व्यवसायाने ५·४० कोटी रुपयांचे परदेशी चलन कमविले.

१९७३-७४ मध्ये बृहन्मुंबईतील सिनेमागृहात ५·३६% ने वाढ झाली, प्रेक्षकांच्या संख्येत ७·७% ने भर पडली आणि करमणूककराची वसुली ६·५% ने वाढली. परंतु, सिनेमा व्यवसायाच्या वाट्याला १२% रक्कम कमी आली.

कराची वसुली १०, १७, ६३, ८०५ रु. ची झाली परंतु सिनेमा व्यवसायाला ६·७८ कोटी रुपये मिळाले. पूर्वीच्या वर्षी कराची वसुली ९,५४,९३,२६२ रु. होऊन सिनेमा-व्यवसायाला ७·८१ कोटी रु. मिळाले होते. १९७३ मध्ये सिनेमा तिकिटांच्यावरील सरचार्जने ८६,०१,४०२ रु. दिले. हा सरचार्ज आता वाढविण्यात आला आहे.

करमणूक कराचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे चित्रपटांचा दर्जा खालावतो, असे पार्लमेंटच्या एस्टिमेटस् कमिटीला आढळून आले आहे. खासगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जावर ३५% ते ६०% व्याज भरावे लागते, हेही दर्जा घसरण्याचे आणखी एक कारण आहे. झालेला खर्च भरून काढण्यासाठी चित्रपट निर्मात्यांना चित्रपटात सेक्स, हाणामारी आणि नग्नता ही समाविष्ट करणे भागच पडते; त्यावरच चित्रपटाचे यश अवलंबून राहते. कर्ज देणारे सावकार अशा देखाव्यांसाठी आग्रह धरतात, कारण त्यांची कर्जफेड चित्रपट लोकप्रिय होण्यावर अवलंबून असते. कराचा बोजा वाढविण्याची राज्यसरकारांत जणू चढाओढच लागलेली असते.

---

## भारतीय संस्कृतीचे चित्रपटातील विकृत दर्शन

"एखाद्या परदेशी माणसाने बरेचसे हिंदी चित्रपट पाहिले, तर त्याचे भारतीय जीवन आणि संस्कृती ह्यांसंबंधी असे मत होईल—"भारतातील प्रत्येक दोघातला एक जण दरोडेखोर किंवा चोर असतो. पुरुषांना आपला वेळ मुजरा आणि कॅबरे बघण्यात खर्च करायला आवडते. वेश्यागमनाची सवय खूप फैलावलेली आहे. बऱ्याच स्त्रिया वेश्याव्यवसाय करतात परंतु खरोखर त्यांना तो पसंत नसतो. विवाह करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येकाला अनेक गुंडांशी सामना केल्याखेरीज इष्ट त्या वधूशी विवाह करताच येत नाही. एकटा अनेकांशी झुंज देतो आणि तो कधीच हरत नाही. सर्व मुलगे आणि मुली जन्मजात कवी असतात आणि गाण्यातही तरबेज असतात. हिरे चोरणे हा येथला छंदच आहे."—नरेश जग्गी ह्यांचे 'स्टार अँड स्टाइल' मधील बक्षीसपात्र पत्र.

---


★ ★ ★

धनवर्धिनी परंपरेतील ११ ४ नवीन योजना

कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचेवेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी

विशेष सेव्हिंग्ज खाते
८·७५ टक्के व्याज, पैसे काढण्यास ९१ दिवसाची पूर्व सूचना.

मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७·२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

मासिक व्याज ठेव योजना
किमान १००० रु. (त्या पटीत)
कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात पसरलेल्या असलेल्या बँकांमधील भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कार्यालय : युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

★ ★ ★

'किर्लोस्कर पंप' हेच ना ? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी ? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रंदिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात. शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामंसुद्धा ते करीत असतात.

'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकारं... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथायोग्य पंप. बरं, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.



किर्लोस्कर


किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.

® Registered users : Kirloskar Brothers Ltd




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८११ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. १)